रे. फौजदारी खटला क्र. **२४४/२०२३**
सरकार विरूद्ध निखील व अन्य एक
**निशाणी १५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : काजल निखील कहार

वय : २६ वर्षे,

धंदा : घरकाम,

राहणार : टाकपुरा, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

मी आरोपींना ओळखते. आरोपी क्र. १ माझा पती असुन, आरोपी क्र. २ हा माझा त्याचा भाउ आहे. माझे लग्न दि. २५/०६/२०१९ रोजी झाले आहे. घटना दि. २९/०७/२०२३ रोजी रात्री ११:०० वाजता घडली. जेवण करून मी, माझी बहिण वैष्णवी व माझी आई पुष्पा असे फिरायला निघालो होतो. अचानक त्याठिकाणी माझे पती आले व त्याने मला मी तुला फारकत देतो व तुझ्या छोट्या बहिणीशी लग्न करतो असे म्हटले. त्याने आम्हाला लोटा—लोट व शिवीगाळ केली. त्याठिकाणी माझा भाउ रोशन व वडिल सुभाष आले असता आरोपींनी त्यांना देखील लोटा—लोट केली. आरोपी क्र. २ याने गाडीतुन लोखंडी रॉड काढला व माझे वडिलांना मारला. त्यामुळे माझे वडिल खाली पडले व त्यांचे रक्त निघत होते. त्यानंतर पवन चंदुलाल कहार व सरवन चंदुलाल कहार यांनी माझे वडिलांना दवाखान्यात नेले. घटनेबाबत मी पोलीसांत फिर्याद दिली होती. आता मला फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादला **निशाणी १६** देण्यात येते. आता मला प्रथम खबर अहवाल दाखवला. त्यावर देखील माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. प्रथम खबर अहवालला **निशाणी १७** देण्यात येते. पोलीसांनी माझे बयाण नोंदवले होते. पोलीसांनी मला दवाखान्यात पाठवले होते. पोलीसांना घटनास्थळ मी दाखवले होते. आरोपी क्र. २ ने ज्या लोखंडी रॉडने माझे वडिलांना मारले तो मला दाखवल्यास मी ओळखु शकते. आता मला एक लोखंडी रॉड दाखवला. याच रॉडने आरोपी क्र. २ ने माझे वडिलांना मारहाण केली होती. सदर लोखंडी रॉडला **मुद्देमाल वस्तु क्र. अ** देण्यात येते. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी** — दोन्ही आरोपीतर्फे ॲड. श्री. एस. जी. कुळकर्णी यांचे मार्फत.

२. मी पोलीस ठाण्यात तोंडी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ हा आरोपी क्र. १ च्या काकाचा मुलगा आहे. सुभाष गौर व

पुष्पा गौर हे माझे आई—वडिल आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दि. १०/०६/२०२३ पासुन मी माहेरी आहे. मी आरोपी क्र. १ ने मला नांदावयास न्यावे यासाठी प्रयत्न केले. आरोपी क्र. १ ने मला नांदावयास न्यावे यासाठी मी त्याला फोन केला होता तसेच आरोपी क्र. १चे वडिल व माझे वडिल यांची मच्छी बाजार येथे मिटींग झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ च्या विरोधात मी व माझ्या बहिणीने केसेस केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ पासुन मला एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ ला आमचे मुलाला भेटु देत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ याने मुलाचा ताबा मिळावा म्हणुन जिल्हा न्यायाधीश — १, अकोट यांच्या न्यायालयात केस दाखल केली आहे. मी आरोपींविरूध्द ४९८ची केस केली किंवा कसे हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र. १ विरोधात खावटीची केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपी क्र. १ सोबत नांदावयाचे नाही यासाठी मी त्याचे विरूध्द खोट्या केसेस केलेल्या आहेत.

३. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर लोकांचे येणे—जाणे तसेच वाहनांची वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या जवळ लोकांची रहिवासी घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहिण वैष्णवी व आरोपी क्र. १ साली—जिजा या नात्याने आपसांत थट्टा—मस्करी करत असत. हे म्हणणे खरे नाही की, माझी बहिण वैष्णवी व आरोपी क्र. १ यांच्यातील थट्टा—मस्करी मला पसंत नव्हती व त्यावरून आरोपी क्र. १ च्या चारित्र्यावर संशय घेत असे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे आई—वडिलांना आरोपी क्र. १ बाबत खोटे सांगितले आहे.

४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ कडे मालवाहु बोलेरो पिकअप गाडी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे आई—वडिलांना आरोपी क्र. १ बाबत उलटे—सुलटे सांगितल्यामुळे माझे आई—वडिलांनी आरोपी क्र. १ सोबत भांडण केले. हे म्हणणे खरे नाही की, माझे आई—वडिलांनी आरोपी क्र. १ याला गाली—गलोच करून मारपीट केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ हा घ टनास्थळी आवरा—आवर करण्यासाठी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे आई—वडिलांनी आरोपी क्र. २ ला देखील शिवीगाळ व मारपीट केली. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझे बहिण—भाउ व आई—वडिल असे सर्वांनी मिळुन आरोपी क्र. १ च्या बोलेरो गाडीला दगडे मारून तिचे नुकसान केले. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपी क्र. १ सोबत लोटा—लाटी केली. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही केलेल्या लोटा—लाटीत माझे वडिल आरोपी क्र. १ च्या गाडीच्या पुढील भागात असलेल्या रॉडवर पडले व त्यामुळे त्यांना दुखापत झाली.

५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ने माझे वडिलांना रॉड मारला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने झालेल्या घटनेदिवशी

झालेल्या घटनेबाबत तक्रार करू नये म्हणुन मी आरोपीविरूध्द खोटा रिपोर्ट दिला आहे.

६. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ याने मी, माझी बहिण, भाउ आणि वडिल यांचेविरूध्द पोलीसांत फिर्याद दिली आहे. मी सरतपासात नमुद केलेल्या घटनेवेळी घटनास्थळी अंदाजे १०—१५ लोकं गोळा झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेदरम्यान माझे वडिलांच्या कपड्यांना त्यांच्या जखमेचे रक्त लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ मला फारकत देत नाही म्हणुन मी त्याचेविरूध्द प्रस्तुत खोटा रिपोर्ट निशाणी १६ दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आम्हाला लोटा—लोट केली व मला तुझ्या लहान बहिणीशी लग्न करतो असे म्हटला हे मी खोटं सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने मला थापडा—बुक्क्याने मारले आणि शिवीगाळ केली हे मी खोटे सांगत आहे. आमचे विरूध्द तहसिलदार यांचे न्यायालयात आरोपीने केस केली आहे किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुद्देमाल वस्तु क्र. अ या रॉडच्या सहाय्याने आरोपी क्र. २ ने माझे वडिलांना मारले हे मी खोट सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ सोबत माझे पटत नसल्यामुळे मी खोटा रिपोर्ट दिला व आज खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी** — काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ११.०७.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

**RCC No. 244/2023**
**Evidence/Exh. 15**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file Evidence are same word to word as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Tq. Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 11/07/2025. |
| Evidence Signed by P.O on | : | 11/07/2025. |
| Evidence Uploaded on | : | 11/07/2025. |